पुणे पोलीस

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

प्रेसनोट क्र. ३०७४ दि. २४ /०९ /२०१९

प्रेसनोट दि. २४/०९/२०१९

**बेकायदेशीर पिस्तुल बाळगणा-यास युनिट ४ कडून अटक**

मा पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी विधानसभा निवडणूक २०१९ चे अनुशंगाने सर्व अवैध व विनापरवाना हत्यार बाळगणा-या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिल्याने युनिट ४ गुन्हे शाखेच्या पोलीस कर्मचारी गणेश साळुंखे व राकेश खुनवे यांना खडकी परिसरातील पाटील इस्टेट येथे पिस्तुल विक्री करता एक इसम येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सदर भागात सापळा लावला असता एक इसम संशयितरित्या उभा दिसला त्यास आहे त्या परिस्थितीत जागेवरच स्टाफच्या मदतीने ताब्यात घेवून त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव पत्ता एकनाथ जान्या धानवत, वय २२ वर्षे, रा संजय गांधी वसाहत, लमान तांडा, पाषाण,पुणे असे असल्याचे सांगितले. त्याची पंचासमक्ष झडती घेतली असता,कंबरेस एक लोखंडी पिस्तुल व दोन जिवंत काडतुसे एकुण कि. रु ३०,८५०/- ची मिळून आली. त्याचेकडे सदर पिस्तुलबाबत अधिक चौकशी केली असता, एका बिहारी इसमाकडून सदरचे पिस्तुल विकत घेतले असून, हौशेसाठी जवळ बाळगले असल्याचे सांगत आहे. सदरबाबत खडकी पो स्टे येथे गुरनं ३१७/१९ आर्म ॲक्ट क ३(२५) मु पो ॲक्ट क ३७(१) सह १३५ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा अपर पोलीस आयुक्त श्री अशोक मोराळे, मा पोलीस उप आयुक्त श्री बच्चन सिंह, पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री विवेक शिसाळ, कर्मचारी गणेश साळुंखे, राकेश खुनवे, सुनिल पवार, शंकर पाटील, हनुमंत बोराटे, यांनी केली आहे.